# ३४. सल्लागार ( Consultant )

भर दुपारची वेळ. एक गुराखी आपल्या शेळया , मेंढया रानात चरायला सोडून झाडाखाली विश्रांती घेत असतो. एक तरूण आपली विदेशी कार घेऊन त्या रानातल्या रस्त्यावरून जात असतो. परिसर बघून तो कार थांबवितो. त्याला झाडाखाली गुराखी दिसतो. तो भारतीय तरूण नुकताच विदेशात शिकून परतलेला असतो. जराश्या उर्मटपणे तो गुराख्याला विचारतो कि तू काय करतोयस ? ( काय प्रश्न ? आपणही एखाद्या शेजा-यास दुपारच्या वेळी घरी दिसला तर विचारतो की काय आज रजा का ? सरळ आहे. नाहीतर सूर्योदयापासून रात्रीपर्यंत कामाला गेलेला तो दुपारी रजेशिवाय दिसणे शक्य आहे का ? असो ) तो गुराखी म्हणतो की मी विश्रांती घेतोय. माझ्या शेळया , मेंढया रानात चरत आहेत. तूझ्याकडे किती शेळया , मेंढया आहेत ते तुला सांगू का ? गुराखी म्हणाला कि मला ह्या माहितीची काही गरज नाही कारण मला ह्याचे उत्तर माहित आहे. पण तुलाच जर ऐवढे वाटत असेल तर सांग.

तो तरूण म्हणतो कि मी जर का उत्तर बरोबर सांगितले तर एक मेंढी मी बक्षिस म्हणून घेऊन जाईन . गुराखी तयार होतो. तो तरूण चपळाईने कारमधून आपला लॅपटॉप , अँटेना काढतो. लॅपटॉप वर काही आकडेमोड करतो व उत्तर सांगतो. उत्तर बरोबर असते. तरूणाला आपल्या विजयाबद्यल अहंकार वाटतो व तो गुराख्याला विचारतो कि मी कोण आहे सांगू शकशील ?

गुराखी शांतपणे त्याला पायापासून डोक्यापर्यंत न्याहाळतो व सांगतो कि तू सल्लागार उर्फ Consultant आहेस. तो तरूण एकदम चमकतो व परत विचारतो की तूला कसे माहीत मी सल्लागार आहे. गुराखी जरा चिडखोर आवाजात म्हणतो कि शिक्षण काय तुमचीच मक्तेदारी आहे का ? तुझा लॅपटॉप , तुझे उर्मट बोलणे , विदेशी गाडीवरून कळले कि तू परदेशात शिकून भारतात परतला असणार. पण मी सुद्धा शेतकी विषयात पदवीधर आहे व माझ्या शिक्षणाचा उपयोग माझ्या कुटूंबाच्या व गावातील लोकांना होण्यासाठी मी गावी परत आलोय. सल्लागार ह्या उत्तराचे विचारशील तर ते एक उघड सत्य आहे. (उघड सत्य) सल्लागार म्हणजे जो दुस-याला माहित असलेलीच माहिती गुळगुळीत कागदावर टाईप करून फीचे पैसे मागतो तो.

तरूण थोडा हिरमुसला होतो. ठरल्याप्रमाणे एक मेंढीचे पिल्लू कानाला धरून जाऊ लागतो. चार पावले चालला नसेल तोच गुराखी त्याला थांबवितो व सांगतो कि अरे तू ज्याला घेऊन जातोयस ते मेंढीचे पिल्लू नसून माझा शिकारी कुत्रा आहे.

असो. तो शिकारी कुत्रा कानाला धरल्यावर चावला का नाही किंवा इतरही काही पैलू ह्या गोष्टीत आहेत ते बाजूला ठेवूया व ह्या गोष्टीचा वेगळया दृष्टीकोनातून विचार करूया.

प्रत्येक माणसाला जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक समस्यांचा मुकाबला करावा लागतो. काही समस्यांना आपल्याकडे उत्तर नसते व सल्लागाराची गरज असते पण बहुसंख्य समस्या सुटणा-या असतात. कित्येक वेळा विचार केल्यानंतर लक्षात येते कि ही काही खूप मोठी समस्या नव्हती. पण आपल्या चिंता करण्याच्या स्वभावामुळे ही समस्या गंभीर वाटत होती.

कोणतीही समस्या सोडावण्यासाठी प्रथम स्वतःला समस्या स्वीकारता आली पाहिजे. बरेच वेळा ह्या स्वीकारातच उपाययोजना दडलेली असते.
काही समस्या बाहेरील बदलली परिस्थिती , न कळलेला बदल ह्यामुळे निर्माण होतात. (स्पर्धेच्या युगात नवीन वस्तू बाजारात येते व आजपर्यंत खपणारी वस्तु खपेनाशी होती कारण नवीन वस्तु जास्त चांगली , स्वस्त असू शकते)
काही समस्या आपण स्वतःच निर्माण केलेल्या असतात व त्याचे उत्तरही आपल्याला माहित असते पण आपले मन ते उत्तर मानायला तयार नसते.
( उदा. आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे अशी आपली इच्छा असते. आपल्याला माहिती असते की प्रवेशासाठी आवश्यक असणारे मार्क आपला मुलगा मिळवू शकणार नाही. बाहेरगावी प्रवेश घेतला तर होणारा आर्थिक भार आपण पेलू शकणार नाही. तरी सुद्धा हा माणूस मुलाला मोठया क्लासला पाठवितो. बायको उपास देवधर्माचे करते व हा माणूस पत्रिका घेऊन ज्यातिषाकडे जातो. आता ह्या वागणुकीला तुम्ही काय म्हणाल ? मी असे म्हणेन की ही समस्या स्वतःच ओढवून घेतली आहे )
आज आपण समाजावर नजर टाकली तर बरेचवेळा हेच दृश्य दिसेल. प्रत्येक जण स्वतःची समस्या सोडविण्यासाठी कुवत बाळगून असतो पण त्याचा स्वतःच्या निर्णय शक्तीवर विश्वास नसतो. मग असा गृहस्थ गुरू करतो , देवधर्माचे करतो , बुवाच्या सुद्धा पाया पडायला मागेपुढे पहात नाही. मग हेच लोक त्याला लुबाडतात. इच्छित लाभ झाला नाहीतर हात झटकून मोकळे होतात. त्या उदासीन गृहस्थाच्या पूर्वसुकृताला नशीबाला दोष देऊन मोकळे होतात. पण अशी माणसे सगळे आपल्या आयुष्यातील अमूल्य वेळ जपाच्या वहया लिहण्यात , तासनतास दर्शनासाठी रांगेत उभे राहण्यात , पूजा , यज्ञ करण्यात घालवित असतात.

ह्या सर्वांना सल्लागाराची आवश्यकता जाता येता का पडावी ? ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे अंगात निर्णयक्षमता नसणे , प्रयत्नावर विश्वास नसणे व समस्या स्वीकारण्यास मन तयार नसणे.

निर्णयक्षमता ही लहानपणापासून शिकवली गेली पाहिजे. मूल मोठे होईपर्यंत आई वडिल मूलाने कोणते कपडे घालावे ? कोणते कपडे त्याला चांगले दिसतात ? त्याने काय शिकावे ? त्याचा दिनक्रम काय असावा ? त्याने कोणाशी मैत्री करावी ? कोणते छंद जोपासावे ? इत्यादी निर्णय घेतात. मुलगा किंवा मुलगी मोठे झाल्यानंतर त्यांनी स्वतःचे निर्णय स्वतःच घेतले पाहिजेत. अर्थात ती चूकू शकतात म्हणून तुम्ही जरूर लक्ष ठेवा पण त्यांचे निर्णय त्यांना घेऊया निर्णय चूकीचा वाटत असेल तर त्यांच्याबरोबर चर्चा करा. समजावून सांगा. पण तुमचे निर्णय त्यांच्यावर लादू नका.

ह्या बाबतीत मी सुदैवी आहे. माझ्या दादानी मला योग्य ते मार्गदर्शन केले होते. त्यांच्या निर्णय घेण्याच्या पद्धतीचा अभ्यास माझ्यासाठी पुरेसा ठरला. माझ्या मुलांवर मी तेच संस्कार केले. लहानपणापासून ट्रेन ने एकटयाने प्रवास करणे , बाजारातून वस्तु आणणे ह्याचे स्वातंत्र्य मी दिले होते. अर्थात मुलांचा सहभाग सर्वात महत्वाचा. दिलेल्या संधीचे त्यांनी सोने केले. बरेच वेळा पालकच परवानगी नाकारतात. तर काही वेळा परवानगी दिल्यानंतरसुद्धा मुलांची निर्णय घेण्याची तयारी नसते.

काय मित्रांनो कशी वाटली गोष्ट एका सल्लागाराची ?

आता तुम्हाला एक गुपीत सांगतो पण कोणाला सांगू नका. ‘ अहो मी पण पेशाने एक सल्लागारच आहे.’